# एआय प्रयोगशाळेचे उद्‌घाटन

*परिवर्तनशील व समाजोपयोगी शिक्षण देण्यात टिळक विद्यापीठ अग्रेसर*

**गोव्याचे मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांचे गौरवोद्‌गार**

समाजाची परिस्थिती ओळखून आवश्यक त्या शिक्षणाची गरज ओळखत, त्या अनुषंगाने शिक्षण देण्याचे निरंतर कार्य टिळक महाराष्ट्र विद्यापीठ करीत आहे. त्यामुळे सामाजिक परिस्थिती घडविण्यासह आणि परिवर्तनशील शिक्षण देण्याच्या महत्त्वपूर्ण कार्यात हे विद्यापीठ अग्रेसर आहे, असे प्रतिपादन गोव्याचे मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांनी केले.

टिळक महाराष्ट्र विद्यापीठात कृत्रिम बुद्धिमत्ता प्रयोगशाळेचे (एआय) उद्‌घाटन डॉ. प्रमोद सावंत यांच्या हस्ते झाले. त्यावेळी ते बोलत होते. याप्रसंगी ‘टिमवि’चे कुलपती डॉ. दीपक टिळक, कुलगुरू डॉ. गीताली टिळक, ‘टिमवि’ ट्रस्टचे उपाध्यक्ष डॉ. रोहित टिळक व प्रशासकीय सल्लागार डॉ. प्रणति रोहित टिळक उपस्थित होते.

मुख्यमंत्री डॉ. सावंत हे एका कार्यक्रमानिमित्त पुण्यात आले होते. ‘टिमवि’चे माजी विद्यार्थी असल्याने त्यांनी विद्यापीठाला भेट दिली. विकास चॅरिटेबल ट्रस्टच्यावतीने किर्लोस्कर ब्रदर्स

लिमिटेड कंपनीचे अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक संजय किर्लोस्कर यांनी ‘टिमवि’ला कृत्रिम बुद्धिमत्ता प्रयोगशाळेसाठी निधी दिला आहे.

डॉ. सावंत म्हणाले, लोकमान्य टिळक यांची विचारसरणी निरंतर पुढे नेत टिळक विद्यापीठ शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रात कार्यरत आहे. समाजाची गरज ओळखून ‘टिमवि’ने अभ्यासक्रम सुरू केले आहेत. विद्यापीठात सर्व विषयांच्या शाखा, विभाग आहेत. आयुर्वेदामध्ये मोठे संशोधनदेखील विद्यापीठाने केले आहे. विद्यापीठाचे कार्य वाखाणण्याजोगे आहे. बदलत्या तंत्रज्ञानाची गरज ओळखून ‘टिमवि’ने एआय लॅब सुरू केली आहे. आपला विद्यार्थी आधुनिक तंत्रज्ञानाने कुशल होण्याबरोबरच सामाजिक प्रगतीसह नवीन पिढी घडविण्यासाठी ‘टिमवि’चे कार्य कौतुकास्पद असल्याचे डॉ. सावंत यांनी सांगितले. टिळक महाराष्ट्र विद्यापीठाने काळानुरूप शिक्षणामध्ये बदल केले आहेत. व्यवसायाभिमुख शिक्षण देण्यात विद्यापीठ अग्रेसर आहे. वैद्यकीय आणि अभियांत्रिकीचे शिक्षण विद्यापीठ देत नसले तरी, संशोधनात ‘टिमवि’चे काम मोठे आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता ही काळाची गरज ओळखून विद्यार्थ्यांसाठी ‘एआय’चे शिक्षण उपलब्ध करून दिल्याने विद्यापीठ अभिनंदनास पात्र आहे. आगामी काळात तरुणांना ‘एआय’ शिक्षणामुळे रोजगाराच्या मोठ्या संधी उपलब्ध होतील. त्यामुळे ‘एआय’ प्रयोगशाळा

विद्यार्थ्यांच्या भवितव्यासाठी नक्कीच उपयोगी ठरेल.
टिळक महाराष्ट्र विद्यापीठातील समाजकार्य विभागात पदव्युत्तर शिक्षण घेण्याचे भाग्य मला लाभले. सामाजिक क्षेत्रात काम करण्याचे धडे मी येथे गिरविले आहेत, अशी आठवण देत डॉ. सावंत म्हणाले, समाजकार्य शिक्षणाचा उपयोग सामाजिक, राजकीय क्षेत्रात नक्कीच होतो, सध्या भारताबरोबरच विदेशातही समाजकार्य समुपदेशकांची गरज आहे. सामाजिक संस्थांनादेखील समाजकार्य पदव्युत्तरच्या विद्यार्थ्यांची गरज आहे. ही विद्यार्थ्यांसाठी मोठी संधी उपलब्ध आहे. आपल्या कामात जिद्द, चिकाटी, सातत्य ठेवल्यास प्रत्येक कार्यात यश प्राप्त होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. दीपक टिळक यांनी केले. ते म्हणाले, ‘टिमवि’चा विद्यार्थी मुख्यमंत्री होतो आणि पुन्हा विद्यापीठाला भेट देतो हे खरोखरच आनंददायी व अभिमानास्पद आहे. नवीन शैक्षणिक धोरणानुसार विद्यापीठात शिक्षण देण्यात येते. पुढील युग कृत्रिम बुद्धिमत्तेचे असणार आहे. विद्यार्थ्यांना त्याचा नक्कीच फायदा होईल, असेही यावेळी त्यांनी नमूद केले.  सूत्रसंचालन सहायक प्राध्यपिका अनुजा पालकर यांनी केले. कार्तिकी सुबकडे यांनी आभार मानले.






TILAK MAHARASHTRA VIDYAPEETH
ISO 21001: 2018 Certification
welcomes

